



दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

RNI No. MAHMAR/2007/24252

तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25





अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १९७। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार १५/०८/२०२६ । पाने - ६







# ३६ हजार कंपन्या प्रत्यक्षात की कागदोपत्री बंद ?

## शरद पवारांच्या टीकेला फडणवीसांचे आकडेवारीसह उत्तर

मुंबई (वृत्तसंस्था)

पुण्यातील चाकण औद्योगिक वसाहतीतून २० कंपन्यांचे स्थलांतर आणि महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत तब्बल ३६ हजार २११ खासगी कंपन्या बंद पडल्याच्या आकडेवारीवरून राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी उद्योगांच्या स्थलांतरावरून राज्य सरकारवर निशाणा साधल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'एक्स'च्या माध्यमातून पवारांच्या आरोपांना सविस्तर आणि आकडेवारीसह उत्तर दिले आहे.

नुकत्याच झालेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात खासदार राजाभाऊ वाजे यांनी विचारलेल्या प्रश्नाला केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरातून महाराष्ट्रातील गेल्या पाच वर्षांतील ३६,२११ खासगी कंपन्या बंद झाल्याची माहिती समोर आली होती. याच आकडेवारीचा आधार घेत शरद पवार यांनी चाकण एमआयडीसीतील मूलभूत सुविधांच्या अभावामुळे २० कंपन्या स्थलांतरित होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

'हा यशवंतराव चव्हाणांचा महाराष्ट्र; उद्योगांचे स्थलांतर राज्याला भूषणावह नाही', अशा शब्दांत पवारांनी सरकारवर टीका केली होती. त्यामुळे उद्योग, गुंतवणूक आणि रोजगाराच्या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली.



शरद पवारांच्या टीकेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केवळ राजकीय प्रतिवाद न करता उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषणच मांडले. 'तुम्ही महाराष्ट्रहिताचा विचार करणारे सुजाण आणि ज्येष्ठ नेते आहात, त्यामुळे तुमच्या मनात कोणताही गैरसमज राहू नये,' असे म्हणत फडणवीसांनी कंपन्या बंद होण्यामागील वास्तविक स्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

फडणवीसांच्या म्हणण्यानुसार, बंद झालेल्या ३६ हजारांहून अधिक कंपन्यांपैकी तब्बल ७६ टक्के कंपन्या 'डिफंक्ट' आहेत. म्हणजेच या कंपन्या प्रत्यक्ष व्यवसाय सुरू न करता केवळ कागदोपत्री अस्तित्वात होत्या. याशिवाय १२ टक्के कंपन्यांचे विलीनीकरण झाले असून केवळ २ टक्के कंपन्या विसर्जित झाल्याचे त्यांनी नमूद केले. फडणवीसांनी २०१९-२० मध्ये केंद्र सरकारने राबवलेल्या विशेष मोहिमेचाही संदर्भ दिला. या मोहिमेद्वारे देशभरातील सुमारे ६ लाख निष्क्रिय कंपन्यांची नोंदणी रद्द करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे 'कंपन्या बंद पडल्या' या आकडेवारीचा सरसकट अर्थ उद्योग महाराष्ट्रातून निघून गेले, असा काढणे योग्य नसल्याचे मुख्यमंत्र्यांनी सूचित केले.

फडणवीसांनी देशातील सक्रिय कंपन्यांची संख्या सांगत उद्योग क्षेत्राच्या व्यापक चित्राकडेही लक्ष वेधले. २०१५-१६ मध्ये देशात ६ लाख ७८ हजार ७६८ सक्रिय कंपन्या होत्या. ही संख्या आता २१ लाख १७ हजार ७४७ वर पोहोचली आहे. म्हणजेच गेल्या दहा वर्षांत सक्रिय कंपन्यांच्या संख्येत तिपटीहून अधिक वाढ झाल्याचा दावा त्यांनी केला.



(पान २वर)


# नाशिकमध्ये आठ दिवसात दुसऱ्यांदा भूकंपाचे धक्के

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिक पुन्हा एकदा भूकंपाने हादरलं आहे. नाशिकमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. ३.४ रिश्टल स्केल एवढ्या या भूकंपाची नोंद झाली आहे. भूकंपाचे धक्के जाणवताच नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. गेल्या काही दिवसांपासून नाशिक जिल्ह्यात भूकंपाचे धक्के ठरावीक अंतराने जाणवत आहेत. दरम्यान 'नाशिक आणि गुजरातच्या परिसरात भूगर्भात अनेक हालचाली सुरू आहेत. मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने पाणी जमिनीत झिरपले आहे. टेक्टॉनिक प्लेट्स मध्ये मोठ्या हालचाली झाल्याने भूकंपाचे सौम्य धक्के बसत आहेत.

नागरिकांनी या संदर्भातील आवश्यक काळजी घेणं गरजेचं आहे, अशी माहिती नाशिकचे



भूकंप अभ्यासक डॉ.किरणकुमार जोहार यांनी दिली आहे.दरम्यान गेल्या आठवड्यात शनिवारी रात्रीच्या सुमारास देखील नाशिक जिल्ह्यात भूकंपाचे धक्के जाणवले होते.

दरम्यान त्यानंतर आता पुन्हा एकदा नाशिक भूकंपाच्या धक्क्याने हादरलं आहे. नाशिकमध्ये पुन्हा एकदा ३.४ रिश्टल स्केल एवढ्या तीव्रतेचा भूंकप झाला आहे. नाशिक आणि गुजरातच्या परिसरात भूगर्भात अनेक हालचाली सुरू आहेत, त्यामुळे भूकपांचे धक्के बसत असल्याचं मत भूकंप अभ्यासकांनी व्यक्त केलं आहे.






# घराजवळील विहिरीत पडून ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

निमोण - संगमनेर तालुक्यातील निमोण येथे घराजवळील विहिरीत पडून ३० वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. किरण गाडेकर असे मयत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, किरण गाडेकर हे रात्रीच्या सुमारास त्यांच्या घराजवळील विहिरीत पडले. मात्र, ही घटना रात्रीच्या वेळी घडल्याने त्याची तत्काळ कोणालाही माहिती मिळाली नाही. सकाळी या घटनेची माहिती शिवछत्रपती फायर अँड सेफ्टी महाविद्यालय तसेच संगमनेर साखर कारखान्याच्या सेफ्टी विभागाला मिळाली. माहिती मिळताच संबंधित पथकांनी तातडीने निमोण येथे धाव घेत विहिरीत शोधमोहीम सुरू केली. तब्बल दीड तास शोध घेतल्यानंतर पथकाला किरण गाडेकर यांचा मृतदेह विहिरीत आढळून आला. त्यानंतर मृतदेह विहिरीबाहेर काढण्यात आला.



किरण गाडेकर हे नेमके कोणत्या परिस्थितीत विहिरीत पडले, याबाबत अद्याप निश्चित माहिती मिळालेली नाही. या घटनेचा पुढील तपास संगमनेर तालुका पोलीस करीत आहेत.

# शस्त्रनिर्मितीसाठी १,५०० एकर जमीन निबे ग्रुपला

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव येथे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची तब्बल १ हजार ५०० एकर जमीन निबे ग्रुप (ग्लोबल डिफेन्स इंडस्ट्रीज लिमिटेड) या खासगी कंपनीला औद्योगिक प्रकल्पासाठी भाडेपट्ट्याने देण्यास राज्य शासनाने अंतिम मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे हरेगावसह अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या औद्योगिक गुंतवणुकीचा मार्ग मोकळा झाला असून, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे.

राज्य शासनाच्या हरित हायड्रोजन धोरणाच्या अनुषंगाने 'सस्टेनेबल एव्हिएशन फ्युएल' प्रकल्प उभारण्यासाठी ही जमीन देण्यात येणार आहे. तसेच निबे ग्रुपकडून संरक्षण क्षेत्राशी संबंधित उत्पादन प्रकल्प उभारण्याचीही तयारी असल्याने या प्रकल्पाकडे औद्योगिक तसेच संरक्षण उत्पादनाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.

विशेष म्हणजे, या जमिनीच्या वाटपासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ही जमीन कंपनीला भाडेपट्ट्याने देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.



दरम्यान, मंजूर झालेल्या १ हजार ५०० एकरपैकी सुमारे ९०० एकर जमिनीवर सध्या पीक उभे आहे. हे पीक काढल्यानंतरच संबंधित जमीन कंपनीच्या ताब्यात देण्यात येणार आहे. भविष्यात महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने ही जमीन विक्री करण्याचा निर्णय घेतल्यास निबे ग्रुपला खरेदीसाठी प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे. शासनाने जमीन देताना विविध अटी व नियम निश्चित केले आहेत. त्यानुसार ही जमीन सुरुवातीला


(पान ६ वर)




**स्वातंत्र्यदिन**

स्वातंत्र्यदिनानिमित्त सुट्टी असल्याने रविवार दि. १६/०८/२०२६ चा अंक प्रकाशीत होणार नाही याची आमचे वाचक जाहीरातदार वितरण प्रतिनिधी यांनी नोंद घ्यावी














# व्यसनमुक्तीसाठी समुपदेशनाची गरज - आ. डॉ. किरण लहामटे



युवावार्ता(प्रतिनिधी)

राजूर - व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी केवळ उपचार नव्हे, तर योग्य समुपदेशनाचीही गरज आहे. शालेय स्तरापासून विद्यार्थ्यांना मूल्यशिक्षण दिल्यास भावी पिढी सुसंस्कारी आणि व्यसनमुक्त घडण्यास निश्चितच मदत होईल, असे प्रतिपादन आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, राजूर सेवा केंद्राच्या वतीने आयोजित 'भारत नशामुक्त महाअभियान'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी कुटुंब, शाळा आणि समाजाने एकत्रितपणे प्रयत्न करण्याचे आवाहन केले. महापुरुष व आदर्श व्यक्तींचे जीवनचरित्र विद्यार्थ्यांना सांगितल्यास त्यांच्या विचारांमध्ये सकारात्मक परिवर्तन घडून येण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले.

राहुरी सेवा केंद्राच्या संचालिका नंदा दीदी यांनी सांगितले की, 'आध्यात्मिक नशा हीच कल्याणकारी नशा आहे.' जीवनात आत्मिक शांती, प्रेम आणि समाधान असणे आवश्यक आहे. निर्व्यसनी युवक हे उमललेल्या फुलासारखे असून, हेच युवक भविष्यात भारताचे आधारस्तंभ ठरतील, असे त्यांनी सांगितले.

बाळानंद कोंडार महाराज मवेशी यांनी अन्नदानाचे महत्त्व विशद करत प्रत्येकाच्या जीवनात शांती आणि समाधान नांदावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. सरपंच संतोष बनसोडे यांनी घरातूनच मुलांना चांगले संस्कार मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. संस्कारक्षम आणि व्यसनमुक्त युवाशक्तीच देशाला अधिक बलवान बनवू शकते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बी. वाय. देशमुख होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ब्रह्माकुमार जगन्नाथ आरोटे यांनी केले. यावेळी राजूर सेवा केंद्राच्या संचालिका बी. के. सुनीता, सरपंच संतोष बनसोडे, माजी सरपंच गणपत देशमुख, प्रकाश महाले, बी. के. हारदे मॅडम आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन ब्रह्माकुमार नितीन लहामगे यांनी केले. यावेळी सेवा केंद्रातील भाऊ-बहिणी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांकडून व्यसनमुक्तीची सामूहिक प्रतिज्ञा करून घेण्यात आली.

# पान १ वरून - ३६ हजार कंपन्या ...

मुख्यमंत्र्यांनी ३ जून २०२६ रोजीची आकडेवारीही मांडली. त्यानुसार देशात सर्वाधिक सक्रिय कंपन्या महाराष्ट्रात असून त्यांची संख्या ३ लाख ९६ हजार २११ इतकी आहे. महाराष्ट्रानंतर दिल्ली आणि उत्तर प्रदेशचा क्रमांक लागतो.

इतकेच नव्हे तर नवीन कंपन्यांच्या नोंदणीतही महाराष्ट्र देशात आघाडीवर असल्याचे फडणवीसांनी सांगितले. राज्यात ४१ हजार ५२५ नवीन कंपन्यांची नोंदणी झाल्याचा दाखला देत त्यांनी महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राबाबत वेगळे चित्र मांडले.

चाकणच्या प्रश्नाचे काय?

दरम्यान, चाकण औद्योगिक वसाहतीतील २० कंपन्यांचे स्थलांतर हा स्वतंत्र आणि स्थानिक पातळीवरील गंभीर प्रश्न असल्याचेही या वादातून समोर आले आहे. मूलभूत सुविधा, वाहतूक, पाणी, वीज, रस्ते आणि औद्योगिक पायाभूत सुविधांबाबत उद्योजकांच्या तक्रारी असतील तर त्यावर तातडीने उपाययोजना होण्याची गरज आहे.

त्यामुळे '३६ हजार कंपन्या बंद' या आकडेवारीचा अर्थ काय आणि महाराष्ट्रातील प्रत्यक्ष उद्योगस्थिती काय? यावरून सुरू झालेला हा राजकीय वाद आता आकडेवारीच्या पातळीवर पोहोचला आहे. शरद पवारांच्या टीकेला फडणवीसांनी दिलेल्या या सविस्तर उत्तरामुळे महाराष्ट्रातील उद्योग, गुंतवणूक आणि रोजगाराच्या मुद्द्यावरून आगामी काळात राजकीय संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.

चाकण मधील काही कंपनी चालकांनी या परिसरात काम करणे अवघड झाले असल्याचे सोशल माध्यमांवर येऊन सांगितले होते. रस्ते, पाणी, वीज, कर्मचारी व इतर समस्यांमुळे आमच्यावर स्थलांतर करण्याची वेळ आली असल्याचे म्हंटले होते.

# बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून 'तो' वादग्रस्त निर्णय मागे

हैदराबाद (वृत्तसंस्था)

हैदराबादच्या नालसार विद्यापीठाच्या दीक्षांत समारोहाला दरवर्षी सरन्यायाधीश जात असतात. पण सरन्यायाशीश सूर्यकांत यांनी तरुणांना झुरळाची उपमा दिल्यानं तिथल्या विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांना बोलावू नये आणि ते आले तर आम्ही त्यांच्यावर बहिष्कार टाकू, असं पत्र लिहलं होतं. विद्यार्थ्यांच्या या कृतीची बार कौन्सिल ऑफ इंडियानं गंभीर दखल गेऊन २०२६ च्या बॅचच्या सर्व विद्यार्थ्यांच्या वकिलीवर निर्बंध घातले होते. या विद्यार्थ्यांनी वकिलीची पदवी घेतली तरी त्यांना वकिली सुरु करता येणार नाही, असंही बार कौन्सिल ऑफ इंडियानं म्हंटलं होतं. पण अभिजीत दिपके यांच्या कॉक्रोच जनता पार्टीनं आक्षेप नोंदवताच हा वादग्रस्त आदेश मागं घेण्यात आला. मीडियातल्या बातम्यांच्या आधारावर आम्ही कारवाई करणार नाही, कुलगरुंकडून तीन दिवसांत रिपोर्ट मागवू आणि त्यानंतर कारवाई करु, अशी भूमिका आता बार कौन्सिल ऑफ इंडियानं घेतली.

दरम्यान, विद्यार्थ्यांनी दिलेलं निवेदन, निवेदनावर सही करणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी बार कौन्सिलनं मागवलीय. हे बहिष्काराचं अभियान कुणी सुरु केलं? निवेदनाचा मसुदा कोणी बनवला? कोणी बैठका बोलावल्या? सोशल मीडियावर प्रचारात कोणाची मुख्य भूमिका आहे? वगैरे गोष्टींची बार कौन्सिलकडून चौकशी केली जाणार आहे. माजी विद्यार्थी किंवा बाहेरील कुणी व्यक्ती यात सहभागी आहेत का तेही पाहिलं जाणार आहे.दरम्यान, गुरुवारी बीसीआयने हैदराबादच्या नालसार लॉ विद्यापीठाच्या २०२६ च्या तुकडीतील सर्व विद्यार्थ्यांना वकील म्हणून नोंदणी करण्यावर बंदी घातल्याने हा वाद सुरू झाला. या आदेशात म्हटले आहे की, विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांना प्रमुख पाहुणे म्हणून नियुक्त केल्याच्या विरोधात विद्यार्थ्यांच्या एका गटाने आंदोलन केले होते. मनन मिश्रा यांच्या आदेशात असेही म्हटले आहे की, जे विद्यार्थी देशातील सर्वोच्च न्यायिक पदाचा आदर करत नाहीत, ते जबाबदार वकील बनू शकत नाहीत. बीसीआयने विद्यापीठाला तीन दिवसांच्या आत अहवाल आणि विद्यार्थ्यांची नावे देण्यासही सांगितले. या आदेशामुळे अनेकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या.

# पुण्यात श्रद्धेच्या नावावर दोन धक्कादायक प्रकार

## एका गुरूचा व्हिडीओ चर्चेत, दुसऱ्यावर पोक्सोचा गुन्हा दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे - श्रद्धा आणि अध्यात्माच्या नावाखाली सुरू असलेल्या प्रकारांवरून पुण्यात सध्या चर्चेला उधाण आले आहे. आध्यात्मिक गुरु उमेश तागुंदे यांचे भक्तांकडून पाय धुऊन त्याचे पाणी प्राशन केले जात असल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहेत. दुसरीकडे, दैवी शक्ती प्राप्त असल्याचा दावा करणाऱ्या स्वप्नील लांडे याच्यावर अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याचा गंभीर आरोप असून, त्याच्याविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही घटनांमुळे श्रद्धा, अंधश्रद्धा आणि तथाकथित आध्यात्मिक गुरूंच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

उमेश तागुंदे यांच्या व्हायरल व्हिडीओमध्ये काही शिष्य-शिष्यांकडून त्यांचे पाय पाणी आणि दुधाने धुतले जात असून, त्यानंतर ते पाणी प्राशन करताना दिसत आहेत. या प्रकाराबाबत अंधश्रद्धा पसरवली जात असल्याचा आरोप होत आहे. याबाबत उमेश तागुंदे यांनी माध्यमांशी बोलताना भक्तांना पाय धुऊन पाणी पिण्याचे कोणतेही आदेश आपण देत नसल्याचे स्पष्ट केले.

भक्त स्वत:हून पाय धुऊन पाणी प्राशन करतात, असे तागुंदे यांनी सांगितले. तसेच आपणही आपल्या गुरूंचे पाय धुऊन त्यांचे पाणी प्राशन करतो, असा दावा त्यांनी केला. गुरुपौर्णिमेच्या दिवशीही आपण भक्तांना आपले पाय धुण्यास



सांगितले नव्हते, उलट त्यांना तसे करण्यापासून रोखत होतो; मात्र भक्तांची श्रद्धा आणि भावना असल्याने त्यांनी हा प्रकार केल्याचे तागुंदे यांनी सांगितले.

तसेच काही भक्त त्यांना 'पप्पा' म्हणून संबोधत असल्याबाबत विचारले असता, आपण स्वतः कुणालाही तसे संबोधण्यास सांगितले नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एका भक्ताच्या प्रेमातून 'पप्पा' म्हणण्याची सुरुवात झाली आणि त्यानंतर इतर भक्तही तसे म्हणू लागल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, पुण्यातील दुसऱ्या एका घटनेने मात्र गंभीर स्वरूप धारण केले आहे. स्वत:ला 'गुरुवर्य' म्हणवून घेणाऱ्या स्वप्नील लांडे याच्यावर अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित मुलीला मांडीवर घेऊन तिच्या कानात मंत्र फुंकला आणि अडचण आल्यास माझ्याकडे ये, असे सांगितल्याचा आरोप त्याच्यावर आहे. या प्रकरणात पीडित मुलीचे समुपदेशन करण्यात आले असून, आरोपी स्वप्नील लांडे याच्याविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो सध्या फरार असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून, आरोपीने आणखी कोणाची फसवणूक किंवा शोषण केले आहे का, याचाही तपास केला जात आहे.

या दोन घटनांमुळे श्रद्धा आणि अंधश्रद्धेच्या सीमारेषेवर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

# खरातची फरार पत्नी शिर्डी पोलीस ठाण्यात हजर



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - वादग्रस्त कॅप्टन खरात विरोधात १७ हुन अधिक गुन्हे दाखल आहेत. खरात याच्या पैशांतून कल्पना खरात हिने हवाला द्वारे संपत्ती खरेदी केल्याचा आरोप आहे. तिच्या विरोधात शिर्डी पोलिसांत गुन्हा दाखल होता. वादग्रस्त तांत्रिक कॅप्टन अशोक खरात याच्या विरोधात नाशिक, सिन्नर आणि शिर्डी सह १७ गुन्हे दाखल आहेत. यासंदर्भात राज्य शासनाच्या विशेष तपास पथकाने त्याची चौकशी करून शासनाला अहवाल सादर केला होता. यामध्ये विविध पतसंस्थांच्या १७ कोटी हून अधिक निधीचा बेनामी वापर केल्याचा गंभीर आरोप होता. कॅप्टन खरात याच्या कोपरगाव येथील समता पतसंस्था तसेच कुंदेवाडी (सिन्नर) येथील श्री जगदंबा माता पतसंस्थेतील बेचाळीस बनावट खात्यांद्वारे पैसे काढण्यात आल्याचा आरोप होता.

यामध्ये १४ कोटी रुपयांचे बेनामी व्यवहार झाले. पैसा बेकायदेशीर मार्गाने पत्नी कल्पना खरात हिच्या नावे वळविण्यात आल्याचा गुन्हा दाखल होता. आज दुपारी कल्पना खरात ही आपल्या वकिलासह शिर्डी पोलिसांत हजर झाली. शिर्डी पोलिसात समता पतसंस्थेतील पैशांचा अपहार आणि बनावट खात्यातील निधीचा हवाला रॅकेट द्वारे विनियोग केल्याचा गुन्हा कल्पना खरात हिच्या विरोधात दाखल होता

कल्पना खरात हिने यापूर्वी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे अटकपूर्व जामीनासाठी प्रयत्न केले होते. त्याआधी जिल्हा न्यायालयात केलेला जामीनाचा प्रयत्न यशस्वी झाला होता. गेले काही दिवस शिर्डी पोलिसांनी कल्पना खरात हिला तपासासाठी हजर राहण्याचे नोटीस बजावली होती.

कल्पना खरात हिच्या नावे सत्तरहून अधिक मालमत्ता आहेत. सुमारे १००० कोटी रुपयांच्या या मालमत्ता असल्याचा दावा केला जातो. शिर्डी, पुणे, नाशिक आणि अन्य शहरांमध्ये कल्पना खरात यांच्या नावे तांत्रिक खरात याने बेनामी संपत्ती द्वारे जमिनी व मालमत्ता खरेदी केल्याचा आरोप आहे. कल्पना खरात ही पोलिसात हजर झाल्याने या प्रकरणातील राजकीय नेते आणि अन्य गुंतवणूकदार यांच्या सहभागाबाबत पोलिसांना माहिती मिळण्याचा मोकळा झाला आहे.

# देशाच्या ८० व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी लाल किल्ला सज्ज

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

यंदा शनिवार १५ ऑगस्ट २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत लाल किल्ल्यावर ८० वा स्वातंत्र्यदिन सोहळा साजरा होणार आहे. या सोहळ्यासाठी लाल किल्ल्यावर जय्यत तयारी केली आहे. यंदा राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम' च्या चिरंतन वारशाची दिडशे वर्षे आणि २०४७ पर्यंत भारताला 'विकसित भारत' बनवण्याच्या प्रवासात 'युवा शक्ती'ची ऊर्जा, आकांक्षा आणि महत्त्वपूर्ण योगदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी जय्यत आखणी करण्यात आली आहे. लाल किल्ल्यावरील या सोहळ्यात प्रथमच 'वंदे मातरम' गीताचे सादरीकरण होईल. तरुण-तरुणी



समूहगान पद्धतीने 'वंदे मातरम' सादर करतील.सकाळी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ आणि संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह हे पंतप्रधानांचे स्वागत करतील. यानंतर संरक्षण सचिव, 'जनरल ऑफिसर कमांडिंग', दिल्ली क्षेत्र, लेफ्टनंट जनरल राजेश सेठी यांची पंतप्रधानांशी ओळख करून देतील. त्यानंतर, जनरल ऑफिसर कमांडिंग (दिल्ली क्षेत्र) पंतप्रधानांना 'सॅल्यूटिंग बेस'पर्यंत घेऊन जातील; तिथे तिन्ही दलांचे संयुक्त पथक आणि दिल्ली पोलीस यांच्या संयुक्त तुकडीकडून नरेंद्र मोदी यांना मानवंदना दिली जाईल. त्यानंतर, पंतप्रधान 'गार्ड ऑफ ऑनर'चे निरीक्षण करतील.पंतप्रधानांसाठीच्या 'गार्ड ऑफ ऑनर' तुकडीमध्ये लष्कर, नौदल, हवाई दल आणि दिल्ली पोलीस या प्रत्येक विभागातून एक अधिकारी आणि चोवीस जवान यांचा समावेश असेल. या वर्षीच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्यासाठी भारतीय लष्कर हे समन्वयक दल म्हणून काम पाहत आहे. 'गार्ड ऑफ ऑनर'चे नेतृत्व लेफ्टनंट कर्नल अर्जुन सिंग करतील. पंतप्रधानांच्या 'गार्ड'मधील लष्करी तुकडीचे नेतृत्व मेजर आदित्य शर्मा, नौदलाच्या तुकडीचे नेतृत्व लेफ्टनंट कमांडर नीलम राणा आणि हवाई दलाच्या तुकडीचे नेतृत्व स्कॉड्रन लीडर विपिन कुमार करतील.

# साखर-मीठाच्या सूचना लेबलवरून सुप्रीम कोर्टाचा FSSAI ला दणका

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पॅकबंद खाद्यपदार्थांमधील साखर, मीठ आणि सॅच्युरेटेड फॅटचे उच्च प्रमाण दाखवणारे 'इशाऱ्याचे लेबल्स' लावण्यास टाळाटाळ करणाऱ्या भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणावर सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांमध्ये ताशेरे ओढले. आदेशाच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाने केंद्र सरकार आणि एफएसएसएआयला अंतिम निर्णयासाठी दोन आठवड्यांची शेवटची मुदत दिली आहे. सार्वजनिक आरोग्य, विशेषतः मुलांच्या आरोग्याशी तडजोड करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती जे. बी. परडीवाला आणि के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला यापूर्वी दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी का झाली नाही, असा सवाल केला. अधिक कठोर पोषणविषयक सूचना लागू करण्यास सरकार का कचरत आहे, याचे स्पष्टीकरण




देतानाच आतापर्यंत केलेल्या उपाययोजनांचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले.पॅकबंद खाद्यपदार्थांमधील साखर, मीठ आणि सॅच्युरेटेड फॅटचे उच्च प्रमाण दाखवणारे 'इशाऱ्याचे लेबल्स' लावण्यास टाळाटाळ करणाऱ्या भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणा वर सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांमध्ये ताशेरे ओढले. आदेशाच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाने केंद्र सरकार आणि एफएसएसएआयला अंतिम निर्णयासाठी दोन आठवड्यांची शेवटची मुदत दिली आहे. सार्वजनिक आरोग्य, विशेषतः मुलांच्या आरोग्याशी तडजोड करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायमूर्ती जे. बी. परडीवाला आणि के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने केंद्र सरकारला यापूर्वी दिलेल्या निर्देशांची अंमलबजावणी का झाली नाही, असा सवाल केला. अधिक कठोर पोषणविषयक सूचना लागू करण्यास सरकार का कचरत आहे, याचे स्पष्टीकरण देतानाच आतापर्यंत केलेल्या उपाययोजनांचा तपशील सादर करण्याचे निर्देश दिले.'उत्पादक धोरण ठरवू शकत नाहीत' 'हा नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित विषय आहे. अशा प्रकरणांमध्ये उत्पादक धोरण ठरवू शकत नाहीत,' असे न्यायालयाने सुनावले. कोणत्याही विशिष्ट उत्पादनाला लक्ष्य करणे हा उद्देश नसून, ग्राहक काय सेवन करत आहेत याची त्यांना स्पष्ट माहिती मिळावी, हा उद्देश असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

पॅकेजिंग आणि पोषणविषयक सूचनांसाठी आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत व्यवस्था निर्माण करण्यात व्यावहारिक अडचणी असल्याचा युक्तिवाद केंद्र सरकारने केला होता. मात्र, सार्वजनिक आरोग्याच्या प्रभावी उपाययोजनांना विलंब करण्यासाठी भारत परदेशी मानकांचा आधार घेऊ शकत नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

केंद्र सरकारला उत्तर दाखल करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दोन आठवड्यांची मुदत दिली आहे. प्रस्तावित चेतावणी लेबल प्रणाली स्वेच्छेने लागू करायची की न्यायालयाच्या निर्देशांची वाट पाहायची, याबाबत सरकारने भूमिका स्पष्ट करावी, असे न्यायालयाने म्हटले. ठोस कारवाई न झाल्यास या प्रकरणी न्यायालय स्वतः निर्णय देईल, असा इशाराही खंडपीठाने दिला.

# राहुल गांधी यांची सर्वोच्च न्यायालयात धाव

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)


लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या एका आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उच्च न्यायालयाने सीबीआय आणि ईडी यांना त्यांच्याविरोधातील उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्तेच्या तक्रारीची चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. या निर्णयाला आव्हान देण्यासोबतच, हे संपूर्ण प्रकरण अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून दिल्ली उच्च न्यायालयाकडे वर्ग करावे, अशी स्वतंत्र मागणीही त्यांनी याचिकेत केली आहे.कर्नाटकातील भाजप कार्यकर्ते विघ्नेश शिशिर यांनी राहुल गांधींकडे घोषित उत्पन्नापेक्षा अधिक मालमत्ता



असल्याचा आरोप करत तक्रार दाखल केली होती. या प्रकरणाची दखल घेत उच्च न्यायालयाने मे महिन्यात सीबीआय आणि ईडीला आरोपांची पडताळणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर सुनावणीदरम्यान उच्च न्यायालयाने सीबीआयच्या प्रतिज्ञापत्रावर तीव्र असंतोष व्यक्त केला होता, तर ईडीने योग्य ती पावले उचलल्याचे मान्य केले होते. या प्रकरणाची अलाहाबाद उच्च न्यायालयात २० ऑगस्ट रोजी सुनावणी होणार आहे.

दरम्यान, राहुल गांधींनी ७ ऑगस्ट रोजी सर्वोच्च न्यायालयात दोन स्वतंत्र याचिका दाखल केल्या आहेत. या दोन्ही याचिकांवर १७ ऑगस्ट रोजी भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या विशेष खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. उच्च न्यायालयाचा आदेश रद्द ठरवण्याबाबत आणि खटला दिल्ली उच्च न्यायालयात स्थानांतरित करण्याबाबत सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.


शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com


संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# शिर्डीत भिक्षेकऱ्यांविरोधात संयुक्त मोहीम



## ७० जणांवर कारवाई

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - गेल्या अनेक दिवसांपासून शहरात भिक्षेकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली होती. या पार्श्वभूमीवर शिर्डी पोलीस ठाणे, शिर्डी नगरपरिषद आणि साईबाबा संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने भिक्षेकऱ्यांविरोधात आजशशश एक विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत सुमारे ७० भिक्षेकऱ्यांना ताब्यात घेण्यात आलंय. ताब्यात घेतलेल्या सर्वांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून त्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाच्या निर्देशानुसार त्यांची पुढील रवानगी करण्यात आल्याची माहिती शिर्डी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी दिली.

श्रद्धा आणि सबुरीचा महामंत्र देणाऱ्या शिर्डीच्या साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातून दररोज हजारो भाविक शिर्डीत येतात. भाविक साईबाबांचे दर्शन घेऊन मंदिराबाहेर आल्यानंतर मंदिराच्या चारही बाजूंना भिक्षेकरी फिरताना दिसतात. हे भिक्षेकरी भाविकांचा पाठलाग करून त्यांना वारंवार त्रास देत असल्याच्या अनेक तक्रारी भाविकांनी शिर्डी साईबाबा संस्थान, नगरपालिका आणि पोलीस ठाण्याकडे केल्या होत्या. भाविकांच्या तक्रारींची दखल घेत प्रशासनाकडून अनेक वेळा भिक्षेकऱ्यांविरोधात संयुक्त कारवाई करण्यात आली आहे. पुन्हा एकदा विशेष मोहीम राबवून ५५ पुरुष आणि १५ महिला अशा एकूण ७० भिक्षेकऱ्यांना मंदिर परिसरातून ताब्यात घेण्यात आलं.

गुरुवारी पहाटेपासून शिर्डी शहरातून ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व भिक्षेकऱ्यांना साईबाबा संस्थानच्या पार्किंग परिसरात आणण्यात आले. त्यानंतर शिर्डी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सर्वांचे छायाचित्र, नाव, गाव आणि ओळखपत्रांची पडताळणी केली. त्यानंतर सर्व भिक्षेकऱ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येत, यानंतर त्यांना राहाता न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाच्या आदेशानुसार महिला भिक्षेकऱ्यांना मुंबई येथे तर पुरुष भिक्षेकऱ्यांना अहिल्यानगर जिल्ह्यातील विसापूर येथील भिक्षेकरी सुधारगृहात रवाना करण्यात आले.

# विकसित ग्रामपंचायतींसाठी प्रभावी विकास आराखडा तयार करा; जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- विकसित भारताच्या निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ग्रामीण भागातील गरजा, उपलब्ध संसाधने आणि स्थानिक विकासाच्या प्राधान्यक्रमांचा विचार करून ग्रामपंचायत स्तरावर सर्वसमावेशक व विकसित ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. व्ही.बी.-जी राम जी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या कामांसोबतच सार्वजनिक स्वरूपाच्या विकासकामांना अधिकाधिक प्राधान्य देऊन ती ग्रामपंचायत विकास आराखड्यात समाविष्ट करावीत, असे मार्गदर्शन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.

विकसित भारत-जी राम जी (ग्रामीण) अर्थात तइ-ऋठ-च-ऋ योजनेबाबत आयोजित जिल्हास्तरीय पंचसंमेलनात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी उपस्थित सरपंच, ग्रामरोजगार सेवक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. ग्रामीण विकासाला अधिक व्यापक दिशा देण्यासाठी ग्रामपंचायत विकास आराखड्याचे प्रभावी नियोजन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्रीमती वर्षा पवार यांनी केले. उपस्थित मान्यवर, सरपंच, ग्रामरोजगार सेवक, अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करण्यात आले.

जिल्हा MIS समन्वयक विकास घिगे यांनी उपस्थितांना व्ही.बी.-जी राम जी योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीचा विकास आराखडा तयार करण्याबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले. यावेळी योजनेच्या प्रमुख तरतुदी, कामांचे नियोजन तसेच योजनेअंतर्गत घेता येणाऱ्या ३१८ प्रकारच्या कामांची माहिती देण्यात आली.

व्ही.बी.-जी राम जी योजनेचे महत्त्व अधोरेखित करताना योजनेअंतर्गत पूर्वीच्या १०० दिवसांच्या तुलनेत १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. योजनेमध्ये मृद व जलसंधारण, वृक्षारोपण, आपत्ती व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा यांसह विविध वैयक्तिक लाभाच्या कामांचा समावेश आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींनी स्थानिक गरजा आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा विचार करून कामांची निवड करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ वैयक्तिक लाभाच्या कामांपुरते मर्यादित न राहता पाणी, माती, पर्यावरण, सार्वजनिक सुविधा, आपत्ती व्यवस्थापन आणि ग्रामविकासाशी संबंधित सार्वजनिक कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. अशा नियोजनबद्ध आणि लोकाभिमुख विकास आराखड्याच्या माध्यमातून विकसित ग्रामपंचायती आणि पर्यायाने विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमात ग्रामविकास अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तयार केलेल्या विकसित ग्रामपंचायत विकास आराखड्याचे सादरीकरण केले. यामधून ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध साधनसंपत्ती, स्थानिक गरजा आणि विकासाची प्राधान्यक्रम निश्चित करून आराखडा कसा तयार करावा, याचे प्रात्यक्षिक उपस्थितांना देण्यात आले.

# पोल्ट्री शेडविरोधात आमरण उपोषण

युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - संगमनेर तालुक्यातील मांडवे-बिरेवाडी गावांच्या हद्दीतील पोल्ट्री शेडवर नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप करत संबंधित पोल्ट्री शेडवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, या मागणीसाठी बिरेवाडी येथील संतोष माणिक गळंगे यांनी शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट रोजी बिरेवाडी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. मागण्या मान्य करून प्रत्यक्ष कारवाई होईपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याचा इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे.



मांडवे-बिरेवाडी शिवालगत मांडवे बुद्रुक हद्दीत घरापासून अवघ्या ५० फुटांच्या अंतरावर सुरू असलेल्या अनधिकृत पोल्ट्री शेडवर कारवाई करावी, तसेच बिरेवाडी हद्दीतील सुमारे ३०० फुटांच्या अंतरावर असलेल्या दोन पोल्ट्री शेडची एन.ओ.सी. रद्द करावी, अशी गळंगे यांची प्रमुख मागणी आहे. आरोग्यास बाधक ठरणाऱ्या पोल्ट्री शेडवर प्रशासनाने तातडीने कारवाई करून ते सीलबंद करावे, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

अस्वच्छता, दुर्गंधी व माशांच्या उपद्रवाचा आरोप गळंगे यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनानुसार, त्यांच्या घराच्या परिसरात तीन पोल्ट्री शेड सुरू असून त्यातून मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी, अस्वच्छता आणि माशांचा उपद्रव निर्माण होत आहे. मृत कोंबड्यांची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली जात नसल्याने परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पोल्ट्री शेडमधील सांडपाणी तसेच कोंबड्यांच्या विष्ठेच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक शोषखड्डे व पक्के काँक्रीटीकरण करण्यात आलेले नसल्याचेही गळंगे यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे सांडपाणी व कचऱ्यामुळे परिसरातील पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तिन्ही पोल्ट्रींची संयुक्त पाहणी व मोजणी करण्याची मागणी मांडवे-बिरेवाडी हद्दीतील तिन्ही पोल्ट्री शेडची संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संयुक्त पाहणी व मोजणी करण्यात यावी, अशी मागणी गळंगे यांनी केली आहे. पाहणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित पोल्ट्रीधारकांवर कायदेशीर कारवाई करून अनधिकृत पोल्ट्री शेड कायमस्वरूपी बंद करण्यात यावेत, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. गळंगे यांनी आपल्या कुटुंबीयांच्या आरोग्य व सुरक्षिततेचाही मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांचे बंधू भारतीय सैन्यात कार्यरत असून त्यांचे कुटुंब याच परिसरात राहत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

वारंवार निवेदने देऊनही कारवाई नसल्याचा आरोप या प्रश्नासंदर्भात संबंधित प्रशासनाकडे यापूर्वी अनेक वेळा निवेदने देऊनही प्रत्यक्ष पाहणी अथवा ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप गळंगे यांनी केला आहे. प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने अखेर आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संतोष गळंगे यांनी सांगितले.

# ई-केवायसी टाळल्यास घरगुती गॅस महागणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गॅस सिलिंडरसाठी ग्राहकांना ई-केवायसी करण्याची मुदत आता अवघे दोन दिवस राहिली आहेत. परंतू ग्राहकांना ई-केवायसी करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, एकट्या नगर जिल्ह्यात २ लाख ग्राहकांनी आतापर्यंत ई-केवायसीची प्रक्रिया पूर्ण केली नसल्याने अडचणी निर्माण होणार आहेत. जिल्ह्यात एलपीजी सिलिंडरचा पुरवठा करणार्या प्रमुख तीन कंपन्या व त्यांचे १२ लाखांवर ग्राहक आहेत. एलपीजी ग्राहकांची अद्ययावत माहिती ठेवण्यासाठी ही प्रक्रिया करणे कंपन्यांनी अनिवार्य केले आहे.




मुदतीत बायोमेट्रिक वा ई-केवायसी पडताळणी न करणाऱ्या ग्राहकांना व्यावसायिक दराने सिलिंडर खरेदी करावा लागणार आहे. अंतिम मुदतीपर्यंत ई-केवायसी न करणार्यांची सबसिडी तात्पुरती स्थगित केली जाईल. प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना घरगुती दराऐवजी बाजारभावाने विकत घ्यावा लागणार आहे. जिल्ह्यात आजघडीला १२ लाख ८३ हजार ४०१ ग्राहक आहेत. त्यातील ८१.३० टक्के ग्राहकांनी ई-केवायसी केली असली तरी अद्यापही २ लाख २ हजार ८४७ ग्राहक एजंसीकडे फिरकलेच नाहीत. परंतु आता शेवटचे दोन दिवस शिल्लक असल्याने ग्राहकांची तारांबळ उडाल्याचे दिसून येत असून गॅस एजंसीवर मोठी गर्दी होणार आहे. कंपनीनिहाय गॅस ग्राहक आणि केवायसी न झालेले बीपीसीएल ७,५७,२१५ (९७ हजार ८८८), एचपीसीएल ४,३२,३०२ (८२ हजार ३६१), आयओसीएल ९३,९४८ (२२ हजार ६२३.

# मालपाणी विद्यालयात पालक मेळावा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - येथील मालपाणी विद्यालयात गुरूवारी इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा विविध शैक्षणिक व विद्यार्थी विकासाच्या विषयांवर साधक-बाधक चर्चा होऊन खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला.

मेळाव्यास संस्थेचे सचिव सतीश लाहोटी, मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पालक प्रतिनिधी दीपिका शिंदे, प्रियंका नाईकवाडी व रविंद्र कोल्हे यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतिमापूजन व स्वागतगीताने मेळाव्याची सुरुवात झाली. मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेत पुढील वर्षातील शैक्षणिक नियोजनाची माहिती दिली.

अश्विनी चकोर यांनी माता पालक समिती गीतांजली गवंडी यांनी शिक्षक पालक समिती , तर सुजाता शेलार यांनी वर्षभरातील शालेय उपक्रम व नियोजनाची सविस्तर माहिती दिली. पालक प्रतिनिधी रविंद्र कोल्हे यांनी पालकांनी मुलांशी नियमित संवाद साधावा, त्यांच्या अभ्यासातील तसेच इतर उपक्रमांतील सहभागाला प्रोत्साहन द्यावे, त्यांचे कौतुक करावे आणि त्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी शिक्षकांशी सातत्याने संपर्क ठेवावा, असे आवाहन केले. संस्थेचे सचिव सतीश लाहोटी यांनी मोबाईल व सोशल मीडियापासून मुलांना दूर ठेवून त्यांचे लक्ष खेळ, वाचन, कला आणि विविध सर्जनशील उपक्रमांकडे वळविण्याची गरज व्यक्त केली. पालकांनी मुलांना मोबाईलव्यतिरिक्त विविध उपक्रमांत गुंतवून ठेवावे, असे त्यांनी सांगितले. यावेळी पालकांनी विविध प्रश्न उपस्थित केले. सचिव सतीश लाहोटी व मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांनी पालकांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत शंकांचे निरसन केले. उपस्थितांचा परिचय व सत्कार सुप्रिया गुंजाळ यांनी करून दिला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शकुंतला खरात यांनी केले, तर आभार प्रदर्शन विनायक हिरे यांनी केले.

# लोटस इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन उत्साहात




युवावार्ता (प्रतिनिधी)

वडगावपान - लोटस इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, वडगावपान येथे ९ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय आदिवासी दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा, कला, संघर्ष, शौर्य तसेच निसर्गाशी असलेले अतूट नाते यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्ताने विद्यार्थ्यांनी आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक कला आणि सादरीकरणे केली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून श्रीमती सुषमा भोसले - मुख्य कार्यकारी अधिकारी, बालेवाडकर शिक्षण संस्था, पुणे; श्रीमती अनिता गायकवाड - संचालिका, आस्क हॉलिडेज, पुणे; श्रीमती बेबी सस्ते - व्यावसायिक, पुणे; डॉ. वनिता शिंदे - शल्यचिकित्सक व संचालिका, शिंदे हॉस्पिटल, अहिल्यानगर; श्रीमती प्रीती मुळे - विज्ञान शिक्षिका, शासकीय शाळा, पुणे; तसेच सौ. आरती देशमुख - विश्वस्त, के.एम.बी.एस. फाउंडेशन व संचालिका, लोटस पूर्व-प्राथमिक विद्यालय, संगमनेर यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी लोटस इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे संस्थापक डॉ. शांताराम निघुते आणि संचालिका डॉ. नीलिमा निघुते यांनी विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीशी नाते जपण्याचे आवाहन केले. आपली मुळे जपा, संस्कृती जपा आणि भावी पिढीला सक्षम बनवा, असा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी वैशाली निघुते, प्राचार्या सौ. आशालता शेट्टी, उपप्राचार्या सारा रोहम तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

या उपक्रमातून आदिवासी समाजाच्या गौरवशाली वारशाचे, सांस्कृतिक परंपरांचे आणि निसर्गाशी असलेल्या अतूट नात्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आले.


ज्येष्ठ साहित्यीक

मा. डॉ. संतोष खेडलेकर
यांना
वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा !
***
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

यशोधन कार्यालय संगमनेरचे जनसंपर्क अधिकारी

मा.श्री. नामदेव कहांडळ
यांना
वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा !
***
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

## संपादकीय...

# स्वातंत्र्यदिन आणि तरुणांची जबाबदारी

१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमान, कृतज्ञता आणि देशभक्तीची भावना जागवणारा दिवस आहे. असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेला त्याग, संघर्ष आणि बलिदान यांची आठवण या दिवशी होते. अनेक वर्षांच्या लढ्यानंतर भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. हे स्वातंत्र्य केवळ परकीय सत्तेपासून मुक्त होण्यापुरते मर्यादित नव्हते, तर स्वतःच्या विकासाचा, प्रगतीचा आणि भवितव्य घडविण्याचा अधिकार मिळवून देणारे होते. त्यामुळे स्वातंत्र्यदिन हा इतिहासाची आठवण करण्याबरोबरच वर्तमानातील जबाबदाऱ्या ओळखण्याचा आणि भविष्यासाठी संकल्प करण्याचा दिवस आहे. आज भारत अनेक क्षेत्रांत वेगाने प्रगती करत असला तरी देशासमोर अनेक नवीन आव्हाने उभी आहेत. सामाजिक विषमता, अज्ञान, बेरोजगारी, भ्रष्टाचार, गरिबी, पर्यावरणाचा ऱ्हास, व्यसनाधीनता, सायबर गुन्हे, खोटी माहिती आणि सामाजिक माध्यमांवरील दिशाभूल करणारे संदेश ही आजच्या काळातील गंभीर आव्हाने आहेत. त्यामुळे परकीय सत्तेपासून मिळवलेले स्वातंत्र्य टिकवण्याबरोबरच या समस्यांपासून समाजाला मुक्त करण्याची जबाबदारीही प्रत्येक नागरिकाची आहे. भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. देशाच्या लोकसंख्येत तरुणांचा मोठा वाटा असून भारताचे भवितव्य त्यांच्या विचारांवर, निर्णयांवर आणि कृतीवर अवलंबून आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिन केवळ ध्वजारोहण, राष्ट्रगीत आणि देशभक्तीपर कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता तरुणांनी राष्ट्रनिर्माणाची शपथ घेण्याचा दिवस झाला पाहिजे. शिक्षण, कौशल्य, सामाजिक बांधिलकी आणि देशहिताची भावना या माध्यमातून तरुण पिढी देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. आजच्या युगातील सर्वात मोठ्या संधींपैकी एक म्हणजे तंत्रज्ञान. मोबाईल, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमुळे जग अक्षरशः हाताच्या तळव्यावर आले आहे. ज्ञान मिळवणे, शिक्षण घेणे, व्यवसाय वाढवणे आणि जगाशी संवाद साधणे पूर्वीपेक्षा सोपे झाले आहे. मात्र तंत्रज्ञानाचा गैरवापरही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. खोटी माहिती, अफवा, द्वेषपूर्ण संदेश, सायबर फसवणूक आणि मानसिक तणाव यांसारख्या समस्या गंभीर बनल्या आहेत. तरुणांनी सामाजिक माध्यमांचा वापर केवळ मनोरंजनासाठी न करता ज्ञान, कौशल्यविकास, उद्योजकता आणि सामाजिक जनजागृतीसाठी करायला हवा. कोणतीही माहिती पुढे पाठवण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, अफवांवर विश्वास न ठेवणे आणि इतरांची दिशाभूल होणार नाही याची काळजी घेणे हीदेखील देशसेवाच आहे. पर्यावरणाचा ऱ्हास ही भविष्यासमोरील गंभीर समस्या आहे. वाढते प्रदूषण, वृक्षतोड, पाण्याची कमतरता, प्लास्टिकचा वाढता वापर आणि हवामानातील बदल यांचा परिणाम पुढील पिढ्यांना भोगावा लागणार आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. तरुणांनी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन, जलसंधारण, पाणी बचत, प्लास्टिकचा कमी वापर, स्वच्छता आणि ऊर्जा बचत यांसारख्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारून इतरांनाही त्यासाठी प्रेरित करणे ही राष्ट्रनिर्माणाचीच एक दिशा आहे. बेरोजगारी आणि कौशल्याचा अभाव हीदेखील देशासमोरील मोठी आव्हाने आहेत. बदलत्या काळानुसार रोजगाराच्या संधी आणि आवश्यक कौशल्येही बदलत आहेत. त्यामुळे तरुणांनी केवळ सरकारी नोकरीच्या प्रतीक्षेत न राहता नवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान, शेतीपूरक व्यवसाय, उद्योग, सेवा क्षेत्र, डिजिटल व्यवसाय, उद्योजकता आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून तरुणांनी स्वतःच्या संधी निर्माण केल्या पाहिजेत. 'नोकरी मागणारा' नव्हे, तर 'नोकरी निर्माण करणारा' तरुण ही आजच्या भारताची खरी गरज आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी स्थानिक संसाधने आणि गरजा ओळखून नावीन्यपूर्ण व्यवसाय उभारल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळू शकते. भारताची विविधता ही देशाची ताकद आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत किंवा सामाजिक स्तर यांच्या आधारे समाजात फूट निर्माण होऊ नये, यासाठी तरुणांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्री. अनिल वामन उगले, रा. कुरण रोड, पानसरे शाळेजवळ, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -, सि. स. नं. - स.नं. १५५,६६९/३१२ या ठिकाणी मध्ये कृषी निविष्ठा विक्री व साठवन गोडाऊन चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. १२/०८/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

# सिद्धार्थ विद्यालयाला माईक सिस्टीमची भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे डिव्हिजन इन्शुरन्स वर्कर्स ऑर्गनायझेशन, शाखा संगमनेरच्या वतीने सिद्धार्थ विद्यालय, संगमनेर या शाळेला साऊंड सिस्टम भेट देण्यात आली. याप्रसंगी एलआयसी च्या असिस्टंट ब्रांच मॅनेजर ज्योती रावत यांनी विद्यार्थ्यांना बचतीचा संस्कार आणि देशाप्रती समर्पित भावनेची आवश्यकता ही मूल्ये सांगितली. विद्यार्थी जीवनात रुजवलेले संस्कार व्यक्तीच्या जीवनाला सुंदर आकार देतात असेही त्या म्हणाल्या.

एलआयसी चे ब्रांच मॅनेजर जयप्रकाश देकाटे यांनी एलआयसी च्या कार्याविषयी माहिती दिली.त्याचबरोबर पुणे डिव्हिजन इन्शुरन्स ऑर्गनायझेशन ही संस्था गरीब, होतकरू विद्यार्थी, कर्मचारी, कामगार, शाळा, वसतिगृहे, दवाखाने, रुग्ण आणि गरजूंसाठी मदत देण्यासाठी तत्पर असते असे सांगितले. यापुढे ही विद्यालयाला योग्य वेळी मदतीचे आश्वासन दिले. या कार्यक्रमासाठी एलआयसी चे संजय खरात, लीला पटेकर, पुनम नागरगोजे, मच्छिंद्र शिंदे, ज्ञानेश्वर होळंबे, अनंत देवकर, संजय कडदेकर, राहुल बकरे आणि अधिकारी कर्मचारी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांना विद्यालयाच्या वतीने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात हर घर तिरंगा या उपक्रमाच्या अंतर्गत ध्वजारोहणाने झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.एम.जगताप सर यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. याच प्रसंगी संगमनेर ग्रामीण रुग्णालय, शाखा घुलेवाडी यांच्यावतीने डॉ. नेवासकर आणि इतर सहकाऱ्यांनी डेंग्यू मलेरिया प्रादुर्भाव त्याचे कारणे आणि उपाय याविषयी माहिती दिली.

मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात तीन फूलझाडांचे रोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकाश पारखे, बाळासाहेब राऊत, तुषार थिटे, दत्तात्रय गोपने, गर्जना गांगुर्डे, सीमा वाघ, बाळासाहेब रूपवते, नंदू भालारे, सुनील यादव, आलेस पंडित यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप स्वच्छता प्रतिज्ञा घेऊन झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्रकाश पारखे यांनी केले. आभार मुख्याध्यापक आर. एम. जगताप यांनी व्यक्त केले.

# ग्रंथालय दिन उत्साहात साजरा

युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर : प्रागतिक शिक्षण संस्थेच्या नूतन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजापूर येथे ग्रंथालय विभागाच्या वतीने १२ ऑगस्ट २०२६ रोजी ग्रंथालय दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच खट-उ चे अध्यक्ष उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतीक्षा खतोडे मॅडम यांच्या स्वागतपर मनोगताने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे ग्रंथपाल आनंद थिटे यांनी केले. त्यांनी ग्रंथालयाचे महत्त्व, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासातील ग्रंथालयाची भूमिका तसेच वाचन संस्कृती जोपासण्याची गरज याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर डॉ. प्रवीण आहेर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी तसेच ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध साधनसंपत्तीचा प्रभावीपणे वापर करावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. प्रा. बाबासाहेब वर्पे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

'ग्रंथालय हे ज्ञानाचे केंद्र असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वाचन संस्कृती अत्यंत महत्त्वाची आहे,' असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी चव्हाण जयश्री मॅडम यांनी उपस्थित मान्यवर, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सहकाऱ्यांचे आभार मानले. ग्रंथालय दिनाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यास तसेच ग्रंथालयातील विविध सुविधांचा अधिकाधिक वापर करण्यास प्रेरणा मिळाली.

# आशेचे द्वार प्रतिष्ठान पुणेतर्फे, शाळेला क्रीडा साहित्य भेट



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील तिगाव जि.प. प्रा. शाळेत आशेचे द्वार प्रतिष्ठान पुणे या सेवाभावी संस्थेमार्फत शालेय विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रीडा साहित्य शाळेला भेट देण्यात आले आहेत. शालेय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण बौद्धिक व शारिरिक विकास व्हावा हा साहित्य भेट देण्यामागील हेतू आहे. क्रीडा साहित्यामध्ये फुटबॉल, व्हालिबॉल, क्रिकेट बॅट, बॅडमिंटन, दोरी, रिंग, निरनिराळे चेंडू, शटल कॉक आदी साहित्य संस्थेमार्फत भेट देण्यात आले.

याप्रसंगी गावचे सरपंच ज्ञानेश्वर सानप यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर भाषणात खेळांची माहिती व खेळाबद्दलचे महत्त्व सांगितले. संस्थेचे महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यात चालणाऱ्या सामाजिक कार्याबद्दल कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका अश्विनी मंजूरे, शिक्षक भीमराज उगलमुगले, जयदेव शेळके यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करून आभार मानले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष जोसेफ पवार, खजिनदार प्रशांत खावाडीया, सचिव सचिन जाधव, टीम लीडर विजय दारोळे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे स्वयंसेवक अमोल खरात, ज्ञानेश्वर कदम, दिपक शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

# मार्तंड राहाणे यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील चंदनापुरी येथील जेष्ठ नागरिक आणि शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामभाऊ राहणे यांचे वडील मार्तंड पाटिलबा राहणे यांचे गुरूवार दि. १३/०८/२०२६ रोजी दुपारी वयाच्या ९६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर सायंकाळी चंदनापुरी येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात पत्नी गं. भा. भागीरथीबाई मार्तंड राहाणे, मुले रामभाऊ मार्तंड राहाणे, भाऊसाहेब मार्तंड राहाणे, मुली सौ. सुगंधाबाई बाच्छव नेहे, सौ. सरूबाई जगन नेहे, सौ. लताबाई रामनाथ सोनवणे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. मार्तंड पाटिलबा राहणे यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# शिष्यवृत्ती परीक्षेत हर्षराज घुले जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत



युवावार्ता(प्रतिनिधी)-

संगमनेर - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खांडगावच्या इयत्ता चौथीतील चि. हर्षराज स्वाती मिलिंद घुले याने शिष्यवृत्ती परीक्षेत ३०० पैकी २३६ गुण मिळवले.३४१ वा क्रमांक पटकावत त्याने जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले. त्याच्या या उल्लेखनीय यशामुळे खांडगावच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याने मिळविलेले हे यश त्याच्या चिकाटी, सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि आत्मविश्वासाचे फलित आहे. अभ्यासातील सातत्य, शिक्षकांनी दिलेल्या मार्गदर्शनाचा योग्य उपयोग आणि परीक्षेची नियमित तयारी यामुळे त्याने हे यश संपादन केले.

या यशामागे त्याच्या वर्गशिक्षिका स्वाती शेटे यांची वर्षभराची मेहनत आणि नियोजनबद्ध मार्गदर्शनाची महत्त्वाची भूमिका आहे. तसेच शाळेतील सर्व शिक्षकांनी केलेले वेळोवेळीचे मार्गदर्शन ही महत्त्वाचे ठरले. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करून घेताना त्यांनी नियमित सराव, प्रश्नपत्रिकांचा अभ्यास, वैयक्तिक मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या अडचणींवर विशेष लक्ष दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सकारात्मक बदल घडून आला.

वर्गातील २२ पैकी १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरले असून वर्गाचा निकाल ६४ टक्के लागला आहे. हर्षराजचे जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीतील यश आणि वर्गातील विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय निकाल हे स्वाती शेटे यांच्या वर्षभराच्या परिश्रमाचे समाधानकारक फलित ठरले आहे.

.हर्षराजच्या या यशाबद्दल गटशिक्षण अधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी मंगला कलगुंडे, केंद्रप्रमुख रवींद्र अनाप, सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य ग्रामपंचायत खांडगाव,विविध पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य, तसेच मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांनी चि.हर्षराज आणि सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

त्याचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी ठरले असून, ग्रामीण भागातील विद्यार्थीही योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर जिल्हास्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करू शकतात, हे त्याने दाखवून दिले आहे.

## तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ मृत्यू नोंद/६०९/२०२६ दिनांक – ११/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. अनंदा साहेबराव सोनवणे, रा. घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक २१/०५/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची बहीण नामे ज्योती साहेबराव सोनवणे यांचा **मृत्यू मौजे घुलेवाडी ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक २६/०७/२०११** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यू** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी घुलेवाडी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी घुलेवाडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

SUBSCRIBE
DAINIK
YUVAVARTA
YOUTUBE
CHANNEL

**पाहिजेत**
सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर
ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)
– संपर्क –
९८२२४५३०३६







**पाहिजेत**
श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
डायलिसिस टेक्निशियन
प्रशिक्षित उमेदवार – २ पदे
कॅथलॅब टेक्निशियन
प्रशिक्षित उमेदवार – २ पदे
कुटे हॉस्पिटल
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
– संपर्क –
8888882225
9766855593

नेवासकर ऑटोमोबाईल्स
**पाहिजेत**
सर्व्हीस सुपरव्हायझर
२ जागा
संगमनेर
8793223344
8446300400

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

## दिनविशेष

१९८८: — मिले सूर मेरा तुम्हारा दूरदर्शनवरून पहिल्यांदाच प्रसारित झाले.
१९८२: — भारतात रंगीत दूरचित्रवाणीच्या प्रसारणास सुरुवात झाली.
१९७५: — बांगलादेशमध्ये लष्करी उठाव. शेख मुजीबूर रहमान कुटुंबीयांची हत्या.
१९७१: — अमेरिकन डॉलरचे सोन्याशी असलेले संधान खंडित झाले.
१९६०: — काँगो देश फ्रांसपासून स्वतंत्र झाला.
१९४८: — दक्षिण कोरिया या देशाची निर्मिती झाली.
१९४७: — पं. नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले.
१९४५: — दुसरे महायुद्ध - जपानने शरणागती पत्करली.
१९२९: — ग्राफ झेपेलिन हा संशोधक बलून मधून जगप्रवासासाठी रवाना झाले.
१८६२: — मद्रास उच्च न्यायालयाची स्थापना झाली.
१८२४: — अमेरिकेतील गुलामगिरी पासून सुटका झालेल्या व्यक्तींनीलायबेरिया हे राष्ट्र निर्माण केले.

## जन्म

१९९२: बास्करन अधिबान — भारतीय बुद्धिबळपटू
१९७५: विजय भारद्वाज — भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक
१९७१: अदनान सामी — भारतीय गायक आणि संगीतकार — पद्मश्री
१९७०: राज कौशल — भारतीय चित्रपट दिग्दर्शक आणि निर्माते (निधन: ३० जून २०२१ )
१९७०: बेन सिल्व्हरमन — अमेरिकन अभिनेते, निर्माते आणि पटकथा लेखक, इलेक्टस स्टुडिओ कंपनीचे संस्थापक
१९६४: मेलिंडा गेट्स — बिल & मेलिंडा गेट्स फाऊंडेशनच्या सह-संस्थापिका
१९६४: श्रीहरी — भारतीय अभिनेते (निधन: ९ ऑक्टोबर २०१३ )
१९६१: सुहासिनी मणिरत्नम — भारतीय अभिनेत्री आणि पटकथालेखक
१९५८: सिंपल कपाडिया — अभिनेत्री आणि वेशभूषाकार (निधन: १० नोव्हेंबर २००९ )
१९४९: सिद्धरामय्या — कर्नाटकचे २२वे मुख्यमंत्री
१९४७: राखी गुलझार — चित्रपट अभिनेत्री

## मृत्यू

२०१३: रोसालिया मेरा — स्पॅनिश उद्योगपती, Inditex आणि Zara चे सह-संस्थापक (जन्म: २८ जानेवारी १९४४ )
२०१३: मारिच मानसिंग श्रेष्ठ — नेपाळ देशाचे २८वे पंतप्रधान, राजकारणी (जन्म: १ जानेवारी १९४२ )
२००५: बँडापुडी वेंकट सत्यनारायण — भारतीय त्वचाशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक
२००४: सुने बर्गस्ट्रोम — स्वीडिश बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (जन्म: १० जानेवारी १९१६ )
२००४: अमरसिंग चौधरी — गुजरातचे ८वे मुख्यमंत्री (जन्म: ३१ जुलै १९४१ )
२०००: लान्सलॉट वेअर — इंग्लिश बॅरिस्टर आणि बायोकेमिस्ट, मेन्सा कंपनीचे सह-संस्थापक (जन्म: ५ जून १९१५ )
१९८२: ह्यूगो थिओरेल — स्वीडिश बायोकेमिस्ट आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (जन्म: ६ जुलै १९०३ )
१९७५: शेख मुजीबुर रहमान — बांगलादेशचे संस्थापक व पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: १७ मार्च १९२० )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१५ ऑगस्ट**

## बँडापुडी वेंकट सत्यनारायण भारतीय त्वचाशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक

बँडापुडी वेंकट सत्यनारायण हे भारतीय वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. त्यांचे नाव त्वचाशास्त्र अर्थात Dermatology या वैद्यकीय शाखेशी जोडले जाते. त्वचाशास्त्रामध्ये त्वचा, केस, नखे तसेच त्वचेवर परिणाम करणाऱ्या विविध आजारांचे निदान, उपचार आणि प्रतिबंध यांचा अभ्यास केला जातो. वैद्यकीय क्षेत्रात त्वचारोग तज्ज्ञांची भूमिका केवळ रुग्णांवर उपचार करण्यापुरती मर्यादित नसून संशोधन, अध्यापन आणि आरोग्यविषयक जनजागृतीमध्येही महत्त्वाची असते.त्वचा हे मानवी शरीरातील अत्यंत महत्त्वाचे अवयव आहे. शरीराचे बाह्य वातावरणापासून संरक्षण करण्याबरोबरच तापमान नियंत्रण आणि विविध संवेदनांमध्ये त्वचेची भूमिका असते. त्वचेवर दिसणारे काही बदल हे शरीरातील इतर आजारांचे संकेतही असू शकतात. त्यामुळे त्वचेच्या विकारांचे अचूक निदान आणि योग्य उपचार करणे आवश्यक ठरते.भारतात हवामान, प्रदूषण, संसर्ग, जीवनशैली, आहार, आनुवंशिकता आणि स्वच्छतेशी संबंधित विविध कारणांमुळे त्वचाविकार आढळतात. मुरुम, एक्झिमा, सोरायसिस, बुरशीजन्य संसर्ग, ॲलर्जी, केस गळणे आणि नखांचे विकार यांसारख्या समस्यांसाठी त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घेतला जातो. अशा परिस्थितीत त्वचाशास्त्रातील आधुनिक ज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरतो.वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रातही त्वचाशास्त्राला विशेष महत्त्व आहे. विद्यार्थ्यांना विविध त्वचाविकारांची लक्षणे ओळखणे, रुग्णाची वैद्यकीय माहिती समजून घेणे, आवश्यक तपासण्या करणे आणि योग्य उपचारपद्धती निवडणे याचे प्रशिक्षण दिले जाते. अनुभवी वैद्यकीय शिक्षकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या चिकित्सकीय विचारक्षमतेच्या विकासासाठी उपयुक्त ठरते.आधुनिक काळात त्वचारोगांच्या निदानासाठी डर्मोस्कोपी, डिजिटल इमेजिंग आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. त्यामुळे त्वचारोगांचे अधिक अचूक निदान करण्यास मदत होते. त्याचबरोबर रुग्णांनी स्वतःहून औषधे किंवा विशेषतः स्टेरॉइडयुक्त क्रीम वापरण्याऐवजी तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. त्वचारोगांबाबत असलेले गैरसमज दूर करण्यासाठी वैद्यकीय जनजागृतीही महत्त्वाची आहे.बँडापुडी वेंकट सत्यनारायण यांच्याबद्दल उपलब्ध सार्वजनिक माहिती मात्र मर्यादित आहे. त्यांच्या वैद्यकीय शिक्षणाची नेमकी माहिती, कार्यस्थळ, संशोधन क्षेत्र, प्रकाशित शोधनिबंध, शैक्षणिक पदे किंवा पुरस्कार याबाबत सर्वसमावेशक आणि अधिकृत माहिती सहज उपलब्ध होत नाही. त्यामुळे त्यांच्या वैयक्तिक जीवनाविषयी किंवा व्यावसायिक कारकिर्दीविषयी अप्रमाणित तपशील देणे योग्य ठरणार नाही.एकूणच, बँडापुडी वेंकट सत्यनारायण यांचे नाव भारतीय त्वचाशास्त्र आणि वैद्यकीय शिक्षणाच्या संदर्भात घेतले जाते. त्वचारोगांचे शास्त्रीय निदान, आधुनिक उपचार, संशोधन, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण आणि रुग्णांमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण करणे या सर्व बाबींना त्वचाशास्त्रात महत्त्व आहे.

## विजय भारद्वाज - भारतीय क्रिकेटपटू व प्रशिक्षक

**जन्मदिन विशेष**

विजय भारद्वाज हे भारतीय क्रिकेटमधील प्रतिभावान अष्टपैलू खेळाडू, प्रशिक्षक आणि समालोचक म्हणून ओळखले जातात. त्यांचे पूर्ण नाव राघवेंद्रराव विजय भारद्वाज असून त्यांचा जन्म १५ ऑगस्ट १९७५ रोजी बंगळुरू, कर्नाटक येथे झाला. उजव्या हाताने फलंदाजी आणि उजव्या हाताने ऑफ-स्पिन गोलंदाजी करणाऱ्या भारद्वाज यांनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या अष्टपैलू कामगिरीची छाप पाडली.भारद्वाज यांनी १९९४ मध्ये कर्नाटककडून रणजी करंडक स्पर्धेत पदार्पण केले. त्यांच्या कारकिर्दीतील १९९८-९९ चा हंगाम अत्यंत उल्लेखनीय ठरला. त्या मोसमात त्यांनी १,४६३ धावा आणि २१ बळी घेतले. त्यांच्या दमदार कामगिरीमुळे कर्नाटकला रणजी करंडक जिंकण्यात मोठी मदत झाली. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्यांनी ९६ सामन्यांत ५,५५३ धावा आणि ५९ बळी घेतले. त्यांच्या नावावर १६ शतके असून सर्वोच्च धावसंख्या नाबाद २०७ अशी



आहे.देशांतर्गत क्रिकेटमधील सातत्यपूर्ण कामगिरीनंतर त्यांना भारतीय संघात स्थान मिळाले. १९९९-२००० मध्ये केनियात झालेल्या L G Cup स्पर्धेत दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत त्यांनी आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. पदार्पणाच्या मालिकेतच त्यांनी प्रभावी गोलंदाजी आणि उपयुक्त फलंदाजी करत मालिकावीराचा पुरस्कार मिळवला. त्यांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत भारताकडून तीन कसोटी आणि दहा एकदिवसीय सामने खेळले. कसोटीत त्यांनी २८ धावा आणि एक बळी, तर एकदिवसीय सामन्यांत १३६ धावा आणि १६ बळी मिळवले.मात्र आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्यांची कारकीर्द अपेक्षेइतकी प्रदीर्घ ठरली नाही. दुखापती आणि त्यानंतर झालेल्या डोळ्यांच्या शस्त्रक्रियेमुळे त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीवर परिणाम झाला. २००६ मध्ये त्यांनी सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.निवृत्तीनंतर भारद्वाज यांनी क्रिकेटपासून दूर जाण्याऐवजी प्रशिक्षण आणि मार्गदर्शन हे क्षेत्र स्वीकारले. त्यांनी BCCI Level-3 कोचिंग प्रमाणपत्र मिळवले. कर्नाटक संघाच्या प्रशिक्षण व्यवस्थेत काम करण्याबरोबरच ते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या प्रशिक्षक व्यवस्थेचाही भाग राहिले. ओमान क्रिकेट संघाच्या प्रशिक्षक व्यवस्थेतही त्यांनी क्षेत्ररक्षण प्रशिक्षक म्हणून काम केले.याशिवाय भारद्वाज यांनी क्रिकेट समालोचक आणि विश्लेषक म्हणूनही आपली वेगळी ओळख निर्माण केली. कन्नड भाषेतील क्रिकेट समालोचनात ते सक्रिय राहिले असून विविध माध्यमांमध्ये क्रिकेटविषयक विश्लेषण केले आहे. अलीकडच्या काळात त्यांनी प्रतिभावान खेळाडू शोधणे, प्रशिक्षण आणि क्रिकेट शिक्षण या क्षेत्रांतही योगदान दिले आहे. त्यांच्या अधिकृत माहितीनुसार ते राष्ट्रीय क्रिकेट अकादमीशी संबंधित प्रशिक्षक/शिक्षक म्हणूनही कार्यरत आहेत आणि दिल्ली कॅपिटल्सच्या टॅलेंट स्काउटिंग व्यवस्थेतही त्यांनी भूमिका बजावली आहे.विजय भारद्वाज यांची कारकीर्द ही देशांतर्गत क्रिकेटमधील उत्कृष्ट कामगिरी, आंतरराष्ट्रीय संधी, प्रतिकूल परिस्थितीवर मात आणि निवृत्तीनंतरच्या प्रशिक्षण-मार्गदर्शनाचा प्रेरणादायी प्रवास आहे.

# जात प्रमाणपत्र अवैध

## कोपरगावच्या उपनगराध्यक्षांचे पद रद्द

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव -कोपरगाव नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशुर यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्याने त्यांचे नगरसेवकपद रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले आहेत. रणशुर यांना सहा वर्षांसाठी पुढील निवडणूक लढविण्यासही अपात्र ठरविण्यात आले असल्याची माहिती ॲड. एम. यू. सय्यद यांनी दिली.

ॲड. एम. यू. सय्यद यांनी पत्रकार परिषद घेऊन वरील माहिती दिली. ते म्हणाले, कोपरगाव नगरपरिषद निवडणुकीत अनुसूचित जाती प्रवर्गातून जितेंद्र रणशुर हे प्रभाग ९ 'अ' मधून नगरसेवकपदावर निवडून आले होते. त्यानंतर ते उपनगराध्यक्ष झाले. निवडणूक लढताना रणशुर यांनी अनुसूचित जातीचे खोटे प्रमाणपत्र दाखल केले, अशा आशयाची हरकत रणशुर यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार सागर निंबा आहेर यांनी अहिल्यानगर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे घेतली होती. त्या हरकतीमध्ये जितेंद्र चंद्रकांत रणशुर यांचा अनुसूचित जातीचा दाखला अवैध ठरविण्यात आला होता.

हा जातीचा दाखला अवैध ठरल्याने रणशुर यांना नगरसेवकपदातून अपात्र घोषित करावे, म्हणून सागर आहेर यांच्या वतीने ॲड. सय्यद यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल केला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी पुरावे व वस्तुस्थितीचा विचार करून निकाल जाहीर केला. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजे २५ जून २०२६ पासून पुढील सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास रणशुर यांना अपात्र घोषित करण्यात येत असल्याचेही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आपल्या आदेशात म्हटले आहे.

## निझर्णेश्वर महादेव मंदिर श्रावण यात्रेसाठी सज्ज; भाविकांसाठी विविध सुविधा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर संगमनेर तालुक्यातील श्री क्षेत्र निझर्णेश्वर महादेव मंदिरात महिनाभर चालणाऱ्या श्रावण यात्रेची जय्यत तयारी पूर्णत्वास आली आहे. जिल्ह्यासह राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने शिवभक्त येथे दर्शनासाठी येत असल्याने देवस्थान विश्वस्त मंडळाकडून भाविकांच्या सोयी-सुविधांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे.

श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी, दि. १७ रोजी पहाटे आमदार अमोल खताळ व त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते भगवान महादेवाचा विधिवत अभिषेक व महापूजा होणार आहे. यानिमित्त मंदिर परिसराला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून, भाविकांना सुलभ आणि सुरक्षित दर्शन मिळावे यासाठी स्वतंत्र दर्शन रांगेची व्यवस्था करण्यात आली आहे.

यात्रेदरम्यान भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राची सुविधा तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गर्दीचे नियोजन व सुरक्षेसाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्तासह देवस्थानचे सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येणार आहेत. तसेच लहान मुलांसाठी खेळणी, प्रसाद, खाद्यपदार्थ, हलवाई व स्टेशनरीची दुकाने, विविध करमणुकीची साधने आणि



वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंगची सुविधा उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. दरम्यान, जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार अमोल खताळ यांच्या सहकार्याने मंदिराचा नवीन सभामंडप (गाभारा) तसेच परिसर सुशोभीकरणाचे काम वेगाने सुरू आहे.

**महादेव मंदिरातील विविध बांधकामांसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तर आमदार अमोल खताळ यांच्या पाठपुराव्यातून पेव्हिंग ब्लॉकसाठी १० लाख रुपये आणि निझर्णेश्वर मंदिर ते निझर्णेश्वर फाटा रस्त्याच्या डांबरीकरण व मजबुतीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मंदिराच्या जीर्णोद्धार व विकासकामांना गती मिळत असताना शिवभक्त आणि भाविकांनी या कार्यासाठी सढळ हाताने सहकार्य करावे, असे आवाहन देवस्थान विश्वस्त मंडळाने केले आहे.**

**बाळासाहेब जोंधळे,**
विश्वस्त तथा खजिनदार,
निझर्णेश्वर देवस्थान

# सहकार संवादातून सहकारी बँका व पतसंस्थांच्या प्रश्नांना मिळणार नवी दिशा

## संगमनेर मर्चंट्स बँकेत सहकार भारतीच्या वतीने 'सहकार संवाद' कार्यक्रम उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सहकार क्षेत्राच्या विकासासाठी सहकारी बँका व पतसंस्थांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, अडचणी आणि नियामक विषयांवर सकारात्मक चर्चा घडवून आणण्यासाठी सहकार भारतीच्या वतीने 'सहकार संवाद' कार्यक्रमाचे आयोजन संगमनेर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभागृहात करण्यात आले. या कार्यक्रमास संगमनेर परिसरातील विविध नामांकित पतसंस्थांचे चेअरमन, व्हाईस चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमास सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. उदयजी जोशी, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री मा. श्री. संजयजी पाचपोर, महामंत्री मा. विवेकजी जुगादे, राष्ट्रीय सहकारी संघाचे संचालक मा. नवलजी कडू तसेच सहकार भारती, अहिल्यानगरच्या अध्यक्ष मा. वासुदेव काकडे यांच्यासह सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच डचइढ बँकेचे चेअरमन मा. सुधाकरजी जोशी हे त्यांच्या बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुशील गुजराथी यांच्यासमवेत उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संगमनेर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन मा.सीए.संजयजी राठी यांनी सध्याच्या सहकारी बँकांसमोरील विविध प्रश्नांचा सविस्तर आढावा मांडला. नियामक बदल, सहकारी बँकांच्या व्यवसायवाढीसमोरील अडचणी, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, पतपुरवठा आणि सहकार क्षेत्राच्या भविष्यातील गरजा याबाबत बँका व पतसंस्थांच्या वतीने विविध मुद्दे मांडण्यात आले.

या संदर्भात सहकारी बँकांच्या वतीने योग्य त्या स्तरावर सादर करण्यासाठी विविध मागण्यांचे व समस्यांचे निवेदन मा. उदयजी जोशी यांना देण्यात आले. त्याचप्रमाणे डचइढ बँकेच्या वतीनेही मा. सुधाकरजी जोशी यांनी आपल्या बँकेच्या समस्या व मागण्यांचे निवेदन सादर केले. या सर्व विषयांवर मा. उदयजी जोशी



यांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले. सहकारी बँका व पतसंस्थांच्या अडचणी योग्य त्या पातळीवर मांडून त्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सहकार क्षेत्र अधिक सक्षम, आधुनिक आणि प्रभावी करण्यासाठी सर्व संबंधित संस्थांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

यावेळी सहकार भारतीचे महामंत्री मा. विवेकजी जुगादे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मा. उदयजी जोशी यांच्या विविध राष्ट्रीय स्तरावरील जबाबदाऱ्यांची माहिती दिली. केंद्र सरकारच्या विविध महत्त्वाच्या समित्यांवर कार्यरत असताना केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शाह तसेच केंद्रीय अर्थमंत्री मा. निर्मला सीतारामन यांच्यासोबत विविध महत्त्वाच्या विषयांवर त्यांच्या बैठका होत असतात. देशाचा अर्थसंकल्प अंतिम करण्यापूर्वी होणाऱ्या झीश-ईीवसर्शी चशर्शींळपसी मध्येही त्यांचा सहभाग असतो, अशी माहिती त्यांनी दिली.

सहकार भारती, अहिल्यानगर जिल्ह्याच्या प्रकोष्ट जबाबदारी असलेले संगमनेर मर्चंट्स बँकेचे संचालक मा. प्रकाशजी कळंत्री यांनी कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बँकेचे व्हाईस चेअरमन मा. रविंद्रजी पवार यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन बँकेचे माजी चेअरमन व विद्यमान संचालक मा. प्रकाशजी राठी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले.

विशेष म्हणजे, संगमनेर मर्चंट्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ६१व्या वर्धापन महोत्सवी वर्षानिमित्त प्रकाशित करण्यात आलेली स्मरणिका यावेळी उपस्थित मान्यवरांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली. सहकारी बँका व पतसंस्थांच्या प्रश्नांवर एकाच व्यासपीठावर सखोल चर्चा, विचारांची देवाणघेवाण आणि राष्ट्रीय स्तरावर प्रश्न मांडण्यासाठी मिळालेले आश्वासन यामुळे 'सहकार संवाद' हा कार्यक्रम सहकार क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण व दिशादर्शक ठरला. संगमनेरच्या सहकार क्षेत्राच्या समृद्ध परंपरेला साजेसा हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला.

पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
• कमी वेदना, जलद बरे होणे
• लेझर व प्रगत तंत्रज्ञान
• अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
• गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
काजळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर



Dr. Ghule's DENTAL CLINIC
Your Smile, Our Passion
स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने
मोफत दंत तपासणी शिबिर
स्वस्थ दात, सुंदर हास्य, निरोगी जीवन
15 ते 19 ऑगस्ट
कालावधी: 15 ऑगस्ट ते 19 ऑगस्ट
मोफत दंत तपासणी | मोफत सल्ला / कन्सल्टेशन | दंत उपचारांवर विशेष सवलत
उपलब्ध सुविधा
दातांची स्वच्छता (Dental Cleaning)
रूट कॅनाल ट्रीटमेंट
दंत इम्प्लांट
ऑर्थोडॉंटिक ट्रीटमेंट (ब्रेसेस/अलाईनर)
कॉस्मेटिक स्माईल डिझाईन
दंत क्राउन व ब्रिज
बालदंत तपासणी
तोंडाच्या कर्करोग तपासणी
आजच अपॉइंटमेंट घ्या आणि निरोगी हसण्याची सुरुवात करा !
अपॉइंटमेंटसाठी संपर्क 9762339490
नित्यसेवा हॉस्पिटल आणि डेंटल क्लिनिक
विद्यानगर, जुन्या एस.बी.आय. बँकेजवळ, हॉटेल करम मागे, संगमनेर

# स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ. घुलेज डेंटल क्लिनिकतर्फे मोफत दंत तपासणी शिबिर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून संगमनेर शहरातील डॉ. नितीन घुले यांच्या घुलेज डेंटल क्लिनिक यांच्या वतीने नागरिकांसाठी १५ ते १९ ऑगस्टदरम्यान मोफत दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

'निरोगी दात, सुंदर हास्य आणि निरोगी जीवन' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये मोफत दंत तपासणी तसेच मोफत सल्ला व कन्सल्टेशन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याशिवाय विविध दंत उपचारांवर विशेष सवलती देण्यात येणार आहेत. दातांची स्वच्छता (डेंटल क्लिनिंग), रूट कॅनॉल ट्रीटमेंट, दंत इम्प्लांट, ऑर्थोडॉन्टिक उपचार (ब्रेसेस/अलाइनर), कॉस्मेटिक स्माईल डिझाईन, दंत क्राउन व ब्रिज, बालदंत तपासणी तसेच तोंडाच्या कर्करोगाची तपासणी अशा विविध सुविधा शिबिराच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दातांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात गंभीर त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे नागरिकांनी नियमित दंत तपासणी करून आपल्या दातांचे व तोंडाचे आरोग्य जपावे, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक तसेच दातांशी संबंधित समस्या असलेल्या नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्लिनिकच्या वतीने करण्यात आले आहे.

शिबिरासाठी पूर्वनियोजित अपॉइंटमेंट आवश्यक असून नागरिकांनी ९७६२३३९४९० या क्रमांकावर संपर्क साधावा. शिबिराचे आयोजन नित्यसेवा हॉस्पिटल आणि डेंटल क्लिनिक, विघानगर, जुन्या एस.बी.आय. बँकेजवळ, हॉटेल करमच्या मागे, संगमनेर येथे करण्यात आले आहे. संगमनेरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मोफत दंत तपासणीचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. नितीन घुले यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वाट भरकटलेल्या पर्यटकांची सुटका

## कळसूबाई शिखरावर पर्यटन करताना सावधान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पर्यटनासाठी आलेले चार पर्यटक कोणत्याही पूर्वतयारीशिवाय आणि वाटाड्याशिवाय गेल्याने अंधार, धुके आणि मुसळधार पावसामुळे वाट भरकटले. आपत्कालीन ११२ क्रमांकावर त्यांनी संपर्क साधल्यानंतर राजूर पोलीस आणि वन्यजीव विभागाच्या पथकाने तातडीने संयुक्त शोधमोहीम राबवली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत रात्रभर मोहीम राबवून वनरक्षक व पोलिसांनी या चारही पर्यटकांना सुखरूप पायथ्याशी आणले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर वन्यजीव विभागाने पर्यटकांना सुरक्षिततेचे नियम पाळण्याचे आवाहन केले आहे.



दिनांक १२ ऑगस्ट रोजी मुंबईहून आलेले काही पर्यटक कोणत्याही वाटाड्याची मदत न घेता अथवा कोणतीही पूर्वतयारी न करता केवळ उत्साहाच्या भरात बारी गावातून शिखराकडे निघाले. दिवसभर शिखरावर भटकंती करताना निसर्गाच्या सौंदर्यात हरवून गेल्याने संध्याकाळ झाल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. अंधार दाटून आल्यानंतर पावसाच्या सरी कोसळू लागल्या. तीव्र थंड वारा आणि पायाखालची निसरडी माती यांमुळे त्यांचा मार्ग पूर्णपणे भरकटला. शेवटी जीवाच्या भीतीने त्यांनी ११२ या आपत्कालीन क्रमांकावर मदतीसाठी संपर्क साधला.

ही माहिती राजूर पोलिसांपर्यंत पोहोचल्यानंतर

ती थेट वनविभागाला देण्यात आली. कळसूबाई-हरिश्चंद्रगड अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी रुपेश गावित आणि वनपाल शंकर लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शोधमोहीम आखण्यात आली. वन्यजीव विभागाचे कर्मचारी चंद्रकांत तळपाडे यांनी पांजरे येथे जाऊन अजय गांगड व दिनकर उघडे यांना सोबत घेतले. भ्रमणध्वनीच्या जीपीएस लोकेशनवरून हरवलेल्या पर्यटकांचा शोध घेत, टॉर्च आणि रेनकोटसह हे कर्मचारी रात्रीच्या काळोखात शिखराच्या दिशेने रवाना झाले. या मोहिमेत राजूर पोलिसांचेही सहकार्य लाभले.

संध्याकाळी साडेसात वाजता सुरू झालेली ही शोधमोहीम काट्याकुट्यांच्या वाटेवरून, चिखल तुडवत आणि धुक्याशी झुंज देत पुढे सरकत होती. अखेर रात्री उशिरा त्या थकलेल्या आणि घाबरलेल्या चार पर्यटकांचा शोध लागला. त्यांना धीर देत वनरक्षकांनी सुखरूपपणे शिखराच्या पायथ्याशी आणले. या घटनेनंतर वर्ज्यजीव विभागाने पर्यटकांना आवाहन केले आहे की, निसर्गाचा आनंद घेताना सुरक्षिततेच्या मर्यादांचा आदर करावा. पावसात आणि/अंधारात बेफिकीरपणे पर्यटन केल्यास मोठा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पर्यटकांनी योग्य काळजी घेऊनच प्रवास करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पान १ वरून -

## शस्त्रनिर्मितीसाठी ...

४९ वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने देण्यात येणार आहे. कंपनीकडून अटींचा भंग न झाल्यास पुढील ४९ वर्षांसाठी भाडेपट्ट्याचे नूतनीकरण करता येणार आहे. जमिनीचे प्रारंभिक भाडे प्रतिएकर प्रतिवर्ष ५० हजार रुपये निश्चित करण्यात आले असून, या भाड्याच्या रकमेत दरवर्षी ३ टक्के वाढ करण्यात येणार आहे. तसेच कंपनीला महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाकडे तीन वर्षांचे भाडे आगाऊ जमा करावे लागणार आहे.

कंपनीला जमीन ताब्यात मिळाल्यापासून दोन वर्षांच्या आत प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे केवळ जमीन ताब्यात घेऊन प्रकल्प रखडविण्याला आळा घालण्याच्या दृष्टीने ही महत्त्वाची अट मानली जात आहे. हरेगाव येथे प्रस्तावित या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. त्यातून स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी, पूरक व्यवसायांना चालना आणि परिसराच्या औद्योगिक विकासाला गती मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाच्या या निर्णयाकडे श्रीरामपूर तालुक्याच्या औद्योगिक वाटचालीतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून पाहिले जात आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करू नका ! सोनेतारण कर्ज कमीत कमी व्याजदर जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि. • पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स • हेल्थ इंडिया इन्शुरन्स • FHPL हेल्थ इन्शुरन्स • इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि. • बजाज आलियांज इन्शुरन्स • एसबीआय जनरल इन्शुरन्स • ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर • मेडसेव टीपीए प्रा.लि. • जेनिन्स इंडिया टीपीए लि. • ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर • टाटा एआयजी इन्शुरन्स • रिलायन्स जनरल इन्शुरन्स • मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स • नॅशनल इन्शुरन्स कं. • न्यू इंडिया इन्शुरन्स कं. • निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स • युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं. • स्टार हेल्थ इन्शुरन्स कं. • दि ओरिएंटल इन्शुरन्स लि. • एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स • युनायटेड हेल्थकेअर लि. • Go digit हेल्थ इन्शुरन्स कं. • मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु. • एम.डी.इंडिया हेल्थकेअर • विडाल हेल्थकेअर प्रा.लि. • पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदासाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटिव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशीनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी, अंगावरून पांढरे जाणे, गर्भ न रहाणे, वारंवार गर्भपात होणे, गर्भाशयात गाठी, गर्भाशयाचा कर्करोग, स्तनांची वाढ न होणे, स्तनातून दूध न येणे, स्तनात गाठी, स्तनाचा कर्करोग
योनी मार्गाची दुर्गंधी, गुप्त अंगाला खाज, विविध त्वचा विकार, गुप्तरोग, गर्मी, लघवीला जळजळ, संभोगात रस न येणे, संभोगा विषयीची भीती, हस्तमैथुनाची सवय, लैंगिक विकृती, मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा B.H.M.S., C.G.O., D.Ac होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक (30 वर्षांचा प्रदीर्घ अनुभव)
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार | ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट • अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी • अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25